आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. १६०

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१४ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव– गोरक्ष अनाजी खोसे

वय – ३६ वर्षे, व्यवसाय– शेती

रा. पाडळीदर्या, ता.पारनेर.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>–**

माझी वडझिरे येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये सेव्हींग्ज अकाउंट होते. बचत खाते क्र. ३२२८०४७६९८ असा आहे. त्याच बँकेत माझे वडीलांचे बचत खाते आहे. त्यांचा खाते क्र.३१५२३०४९०२ असा आहे. गौतम जाधव आमच्या गावाचा आहे व ते सेंट्रल बँक शाखा वडझिरे येथे कामाला होते. काय कामास होते हे माहित नाही. दिनांक २२–०९–२०२० रोजी मी वडझिरे शाखेमध्ये माझ्या खात्यावरुन वडीलांच्या खात्यावर १ लाख ५० हजार रुपये ट्रान्सफर करावयाचे आहेत. त्याकरीता मी गेलो होतो. तेथे गेल्यावर गैातम जाधव बसले होते व मी त्यांना माझ्या खातेवरुन वडीलांच्या खातेवर १ लाख ५०हजार रुपये ट्रान्सफर करावयाचे आहे त्यासाठी काय करु असे विचारले हाते. गौतम जाधवने मला सांगितले की तुमच्या नावाची १ लाख ५० हजार रुपयांची विथड्रॉवल स्लीप भरा व वडीलांच्या नावाची १ लाख ५० हजार रुपयांची सेव्हींग्ज स्लीप भरा. त्या दोन्ही स्लीप भरुन मी गौतम जाधव यांना दाखवल्या. त्यांनी त्या दोन्ही स्लीप बघितल्या व मला सांगितले की त्या स्लीप कॅशियरकडे घेउन जावा व मी त्या स्लीप कॅशियरकडे घेउन गेलो. गौतम जाधव यांनी कॅशियरला सांगितले की त्या दोन्ही स्लीपची पोहोच पावती यांना द्या. कॅशियर त्या दोन्ही स्लीप पाहुन त्याबाबत पोहोच पावतीवर शिक्का व सही करुन पोहोच पावती माझ्याकडे दिल्या. पोहोच पावती घेउन मी घरी गेलो. थोडया वेळाने मला मोबाइलवर दिड लाख रुपये माझ्या खात्यावरुन डेबीट झालेचा मेसेज आला. पाच सहा दिवसांनी वडीलांचे पासबुक भरण्याकरीता बँकेत गेलो असता बँकेकडून आम्हाला उडवा उडवीची उत्तरे मिळाली की, प्रींटर चालत नाही, लाईट नाही. त्यानंतर एक दिड महिन्यांनी वडीलांचे अकाउंटचा खातेउतारा बँकेकडुन मागितला. खातेउतारा पाहील्यावर मला कळाले की दि.२२.९.२०२०

रोजी माझ्या खात्यावरुन वडीलांचे खात्यावर दीड लाख रुपये जमा झालेले नाहीत परंतु माझ्या खात्यावरुन दीड लाख रुपये डेबीट झाले होते. त्यानंतर आम्ही वडझीरे शाखेत ब्रॅंच मॅनेजरकडे त्याबाबत गौतम जाधवविरुध्द तक्रार केली. त्यानंतर दि.६.३.२०२१ रोजी नागापुर शाखा रिजनल मॅनेजर यांचेकडे मी तक्रार दिली. ती तक्रार माझ्या खात्यावरुन दीड लाख रुपये डेबीट झाले परंतु ती रक्कम माझ्या वडीलांच्या खात्यावर जमा झाली नसल्याबाबत होती. आता मला नि.९७ वरील मी दिलेला तक्रारी अर्ज मला दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यानंतर ऑडीट रिपोर्टवरुन चौकशी होवुन गुन्हा दाखल झाला व पोलीसांनी मला दि.२.८.२०२२ रोजी जबाबासाठी बोलावले होते. पोलीसांनी माझा जबाब माझ्या सांगितल्याप्रमाणे घेतला होता व तो मी वाचुन पाहीला होता. आता मला दि.२२.९.२०२० रोजीची माझ्या वडीलांच्या खाते क्र.३१५२३०४९०२ यावर दीड लाख रुपये जमा करण्यासंदर्भात सेव्हींग्ज पावतीची प्रत दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यास ओळखीसाठी **नि.१६१** देण्यात येते. ती स्लीप मीच भरली होती व त्यावर माझे हस्ताक्षर आहे. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी.रोकडे यांच्यामार्फतः</u>**

माझे ग्रॅज्युएशन झाले आहे. मी शेती करतो. माझे व वडीलांचे सेंट्रल बॅंक शाखा वडझीरे येथे खाते असल्याने माझे कायम येणेजाणे असायचे. ब्रॅंच मॅनेजरकडे मी तक्रारी अर्ज किती तारखेला दिला हे लक्षात नाही. अर्जावर तारीख होती का हे माझ्या लक्षात नाही. तो अर्ज मी ब्रॅंच मॅनेजर भुषण संखे यांच्याकडे दिला होता. हे म्हणणे खरे आहे की नि.९७ वरील तक्रारी अर्जात मी गौतम जाधवसहीत विद्या मॅडम, कॅशियर बोरुडे, मॅनेजर व श्री.उघडे यांच्याविरोधात कार्यवाही करण्याबाबत नमुद केले आहे. नि.९७ वरील तक्रारी अर्ज मी तारीख टाकुन दिला होता.

प्रश्न– नि.९७ वरील तक्रारी अर्जावर तारीख का नमुद नाही याचे कारण सांगता येईल का?

उत्तर– आम्ही नगरला जातो की नाही याबाबत ठरले नसल्याने तारीख नंतर मी पेनने टाकली होती.

नि.९७ वरील तक्रारी अर्जावर तारीख कोरी आहे. केवळ महीना व वर्ष

लिहीले आहे व ते बरोबर आहे.

कोर्टाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.09.17 17:57:46 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः १७/०९/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,
पारनेर.